


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १३८ •सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# बीड जिल्ह्यात संततधार
# हजारो हेक्टर वरील पिके उध्वस्त

## जिल्ह्यातील ७ तलाव शंभर टक्के भरले

## नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश

- पाणी वाहत असल्यास प्रवास करू नका
- पूरपरिस्थिती दरम्यान नदीकाठी तलावाच्या ठिकाणी जाऊ नका
- सेल्फीचा मोह करू नये
- पुरपरिस्थितीत मासे पकडण्यास जाऊ नये

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये सलग दोन दिवस धो धो पाऊस पडला. या पावसामुळे अनेक नद्या-नाल्यांना पूर आले. केज तालुक्यात मुसळधार पाऊस पडल्याने तेथील आठ गावातील ६०० हेक्टरमधील पिके पुर्णत: उद्ध्वस्त झाले आहेत. त्याचबरोबर जिल्ह्यातील इतर ठिकाणीही पिकांचे नुकसान झाले. ज्या शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले त्यांचे पंचनामे करण्याचे आदेश महसूल विभागाच्या वतीने देण्यात आले. या पावसाने जिल्ह्यातील सात तलाव शंभर टक्के भरले आहेत. दरम्यान नुकसानग्रस्तांचा आकडा आणखी वाढू शकतो. सहाशे हेक्टर हे फक्त केज तालुक्यातील आहे.



राज्यभरामध्ये गेल्या दोन दिवसांपासून पाऊस पडत आहे. १४ आणि १५ ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील काही भागात मुसळधार तर काही भागात मध्यमस्वरुपाचा पाऊस पडला. केज, अंबाजोगाई, माजलगाव आणि बीड या परिसरामध्ये धो धो पाऊस पडला. या पावसाने केज तालुक्यातील हनुमंतपिंप्री, चिंचोलीमाळी, राजेगाव, दैठणा, बोरगाव, भोपला, हादगाव, डोका, लाखा, मांगवडगाव या ८ गावांतील पिके उद्ध्वस्त झाली. या आठ गावांतील ६०० हेक्टरपेक्षा जास्त पिकांचे नुकसान झाले असून दोन घरांची पडझड देखील झालेली आहे. जिल्ह्यातल्या इतर ठिकाणची पिकेही बाधीत झाली असून नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश महसूल विभागाने दिले आहेत. या पावसामध्ये बिंदुसरा, सिंधफणा, महासांगवी, कडा, कुंडलिका, उर्ध्व कुंडलिका, मांजरा हे सात धरणे शंभर टक्के भरले आहेत.

# मांजरा धारण तुडुंब भरले;
# आ. नमिता मुंदडांनी केले जलपूजन

## धरण भरल्याने शेतकऱ्यांना दिलासा, पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटला : आ. नमिता मुंदडा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

धनेगाव (ता. केज) येथील मांजरा धरण यंदा पूर्ण क्षमतेने भरल्याने केज मतदारसंघातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून अनेक गावांचा पाणीपुरवठा आणि सिचानाचा प्रश्न मार्गी लागला आहे. रविवारी सकाळी आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी धरणस्थळी भेट देऊन जलपूजन



केले. या वेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा, पन्नगेश्वर कारखान्याचे चेअरमन अक्षय मुंदडा, सुनील गलांडे, संजय गंभीरे, भगवान केदार यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. धरण परिसरात बोलताना आ. नमिता मुंदडा म्हणाल्या की, यंदा समाधानकारक पाऊस ▶▶ उर्वरित पान २ वर

# चक्क पाझर तलावात खदाण आणि खडीक्रेशर!

## केज तालुक्यातील केकत सारणी शिवारात पाझर तलावातून बेसुमार अवैध गौणखनिज उपसा

**बीड । प्रतिनिधी**

पाझर तलावातून अवैध गौणखनिज उपसा करून चक्क त्या तलावाला खदाणीचे स्वरूप आले आहे. तसेच तलाव परिसरातच एकाने खडीक्रेशर सुरू केल्याने या खडीक्रेशरला परवानगी कोणी दिली? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले असून केज तालुक्यातील केकतसारणी शिवारात तलावातून अवैध गौणखनिज बेसुमार उपसा झाल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी समाजसेवक रमाकांत



धायगुडे यांनी तक्रार देवून याप्रकरणी कारवाईची मागणी केल्यानंतर त्याठिकाणी संबंधित ▶▶ उर्वरित पान २ वर

# भरपावसात एलसीबी गोदावरी पात्रात

## वाळू माफियांना दणका ;९.५० लाखांचा मुद्देमाल जप्त

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यात गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा व वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळताच एलसीबीचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी भरपावसात गोदावरी नदीपात्रात उतरुन छापा टाकून वाळू माफियांना दणका देत टॅक्ट्रर व रोडर ताब्यात घेऊन ९ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईमुळे पोलीस



निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांचे आभार मानले जात आहे तर वाळू माफियांनी कारवाईचा धसका घेतल्याचे दिसून येत आहे. अवैध वाळू उपसा करणाऱ्या विरोधात कारवाई करण्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

# नशामुक्तीसाठी पोलीस अधीक्षकासह बिडकर पहाटे धावले !

## पोलिस अधिकारी व नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग, नशामुक्तीची सामूहिक शपथ घेतली

**बीड । प्रतिनिधी**

अंमली पदार्थ विरोधी सप्ताहानिमित्त बीड जिल्हा पोलीस दलाने नशामुक्त समाज सुरक्षित भविष्य या निर्धारातून रविवारी पहाटे भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले. छत्रपती संभाजीराजे क्रीडांगण येथून सकाळी ५ वाजता या मॅरेथॉनला प्रारंभ झाला.



शहरातील छत्रपती संभाजी राजे क्रीडांगणातून काल बीड जिल्हा पोलीस दलाकडून नशामुक्ती जनजागृतीसाठी मोटरसायकल मॅरेथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत पोलीस ▶▶ उर्वरित पान २ वर

# ग्रामीण भागाला सिमेंट रस्ते जोडण्याच्या मुख्यमंत्री, ग्रामविकासमंत्री यांच्या घोषणा कागदावरच

## लोकवर्गणीतून रस्ते ग्रामीण जनतेची शोकांतिका : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत १००० लोकसंख्या असलेल्या गावातील प्रमुख रस्ते सिमेंट क्राकीटचे करण्यात येणार असुन त्यासाठी १८ हजार कोटी रूपयांचा निधी मंजूर झाल्याची घोषणा केली. तर ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी राज्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना



वस्त्यापर्यंत पोहोचण्यासाठी सुसज्ज रस्ते मिळावेत. यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत ग्रामीण भागाला जोडणारे १० हजार किलोमीटर पर्यंत व्हाईट टॉपिंगचे सिमेंटचे रस्ते तयार करणार येणार असल्याची घोषणा केली. मात्र ग्रामीण भागातील लोकांना ▶▶ उर्वरित पान २ वर




## थोडक्यात...

### अपघातात युवकाचा मृत्यू

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरातील २५ वर्षीय युवक तालुक्यातील पांगरी येथे सिमेंट कॉंक्रीट मिक्सरवर काम करणाऱ्या व्यक्तीचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना शनिवार दि १६ रोजी सायंकाळी ८ च्या सुमारास घडली. प्राप्त प्राथमिक माहितीनुसार परळी शहरातीलअमेर अजमेर पठाण (वय २५ वर्ष रा बरकतनगर) मिक्सर ऑपरेटर पांगरी येथील काम करत असताना अचानक कशाचा तरी धक्का लागून नदी पात्रात पडून नदी पात्रात आलेल्या पाण्यात वाहून गेला. सदरील घटना शनिवार दि १६ रोजी सायंकाळी ८ च्या सुमारास घडली असून मयत व्यक्तीचे पार्थिव हे उपजिल्हा रुग्णालय परळी येथे आणले आहे.शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मयत अमेर पठाण हे विवाहित असून त्यांना २ अपत्य असल्याचे समजले असून त्याच्या या अपघाती निधनाने बरकत नगर परिसरात शोककळा पसरली आहे.

### बस प्रवासादरम्यान महिलेच्या पर्सवर डल्ला

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राखीपोर्णिमा आटोपून बीडला परत जाणाऱ्या एका महिलेच्या पर्सवर एस.टी. बसमधील गर्दीचा फायदा घेत तीन अनोळखी महिलांनी हात साफ करत दागिने व रोख रक्कम असा सुमारे ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लता बालासाहेब साळवे (वय ४०, रा. धानोरा रोड, बीड) या रक्षाबंधनानिमित्त माहेरी अंबाजोगाई येथे आल्या होत्या. दिनांक १२ ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास त्या अंबाजोगाई येथून बीडकडे जाण्यासाठी छत्रपती संभाजीनगर मार्गावरील एस.टी. बसमध्ये चढल्या. बसमध्ये मोठी गर्दी असल्याने त्या उभ्या राहिल्या. त्यावेळी त्यांच्या पायाजवळ एक अनोळखी महिला बसली होती, तर दोन महिला उभ्या होत्या. लोखंडी सावरगाव येथे या तिन्ही महिला गर्दीतून उतरत असताना लता साळवे यांना संशय आला. त्यांनी लगेचच आपली पर्स तपासली असता त्यातील एक तोळ्याचे झुंबर कानातले, पाच ग्रॅम वजनाचे मनी मंगळसूत्र व पाच हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ९५ हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेलेला आढळला. त्यानंतर त्यांनी होळ येथे उतरून अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात चोरीची तक्रार दिली. पोलिसांनी अनोळखी तिन्ही महिलांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार प्रवीण उल्हे करीत आहेत.

### जलसमाधी आंदोलनात वाहून गेला; ४४ तासांनंतर १४ किमी अंतरावर सापडला मृतदेह

**बुलढाणा । प्रतिनिधी**

गावक-यांच्या हक्कासाठी लढताना बुलढाण्यातला एका समाजसेवकाला आपल्या प्राणाची आहुती द्यावी लागल्याचा प्रकार समोर आला आहे. बुलढाण्यातील विनोद पवार हे प्रशासनाची दिरंगाई आणि उदासीनतेचा बळी ठरलेत, स्वातंत्र्य दिनालाच ही घटना घडल्यानं गावक-यांवर दुखाचा डोंगर कोसळला. हा आक्रोश आहे प्रशासनाच्या उदासीनतेमुळे नाहक बळी गेलेल्या समाजसमेवकांच्या कुटुंबाचा. बुलढाणा जिल्ह्यातील आडोळ खुर्द गावातले तरुण सम ाजसेवक विनोद पाटील यांनी गावक-यांच्या मुलभूत हक्कांसाठी अनेक वर्षांपासूनच्या प्रलंबित मागण्यांसाठी १५ ऑगस्टला जलसमाधी आंदोलनाचा इशारा दिला. गावकरी रस्ते, पाणी आणि घरांसाठीच्या मूलभूत प्रश्नांसाठी जिगाव प्रकल्पाजवळ जलसमाधी आंदोलनात विनोद पाटील आघाडीवर होते. पोहता येत नाही हे निवेदनात त्यांनी तसं नमूदही केलंल.


### सापाचा वाढदिवस साजरा करणाऱ्या 'वाघा'ला अटक!




**धुळे । प्रतिनिधी**

शिरपूर तालुक्यातील बोराडी गावातील एक आश्चर्यकारक प्रकार समोर आला आहे. नागपंचमीच्या दिवशी एका सर्पमित्राने नागासमोर केक ठेवून त्याचा वाढदिवस साजरा केला. एवढेच नाही तर त्याचा व्हिडीओ इन्स्टाग्रामवर टाकून रिल्स तयार केली. हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड वेगाने व्हायरल झाल्यानंतर संबंधित सर्पमित्राला वनविभागाच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. ही घटना बोराडी येथील रहिवासी सर्पमित्र राज वाघ याच्याशी संबंधित आहे. माहितीप्रमाणे, राज वाघ याने काही दिवसांपूर्वी गावातीलच एका घरातून नागाचे रेस्क्यू केले होते. त्यानंतर नागपंचमीच्या निमित्ताने त्याने या नागासमोर केक ठेवून वाढदिवस साजरा केला. केक कापताना व नागाला समोर ठेवून खाऊ घालत असल्याचा व्हिडिओ त्याने इन्स्टाग्रामवर अपलोड केला. हा व्हिडीओ व्हायरल होताच वनविभागाच्या अधिकाऱ्यांचे लक्ष या घटनेकडे वेधले गेले. शिरपूरचे सहायक वनसंरक्षक तसेच बोराडी प्रादेशिक वनक्षेत्रपाल यांनी याबाबत तपास सुरू केला. त्यानंतर रेंज स्टाफ सांगवी व बोराडी यांच्यासह पथकाने कारवाई करत राज वाघ याला ताब्यात घेतले. वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार सर्पांशी असे प्रयोग करणे, त्यांचा मनोरंजनासाठी वापर करणे किंवा त्यांच्यासोबत व्हिडीओ शूट करून सोशल मीडियावर टाकणे हा गुन्हा मानला जातो.

# त्यात काय येवढं....



आॅफीस सुटल्यावर घरी निघालो, खूप भूक लागली होती. पण आई व बायको दोघींही घरी नव्हत्या म्हणून रस्त्यात पाणी पुरीची गाडी दिसली म्हणून पाणीपुरी खाण्यासाठी थांबलो. पाणीपुरीवाल्याकडे गर्दी होती. गपचूप आपला नंबर येईपर्यंत वाट बघण्यापालिकडे काही हातात नव्हते.

पाणीपुरीवालाच्या बाजूला एक आजोबा त्यांचा नंबर यायची वाट बघत उभे होते. पायात पांढरा शुभ्र पायजमा, वर हाफ शर्ट, चेहऱ्यावर निर्विकार भाव, आणि हसरा चेहरा, वय वर्ष साधारण ६५-७०.

आजोबा मस्त पाणीपुरी च्या पिशवीत हात घालून एक एक कोरडी पुरी तोडांत कोंबत होते. माझा नंबर आला. पाणीपुरीवाल्यासमोर द्रोण हातात घेऊन उभा राहिलो. व एकामागोमाग एक पाच पाणीपुऱ्या खाल्लया. पोटातली आग जरा शांत झाली होती. आजोबांचा मात्र पुऱ्या खाण्याचा कार्यक्रम चालूच होता. पाणीपुरीवाला चांगलाच वैतागला होता.

बाबूजी प्लेट देता हुँ। बराबरसे खाओ ना आजोबांनी नुसतेच गालातल्या गालात हसून पुऱ्या खाणे चालूच ठेवले.

एक प्लेट पाणीपुरी खाऊन माझे तोंड खवळले होते. म्हणून आजून एक पाणीपुरीची प्लेट सुरु केली.

आजोबा मात्र तल्लीन होऊन पिशवीमधल्या पुऱ्या मटकावत होते. ओ आजोबा नीट घेऊन खा की? मी बोललो. आजोबा हू नाही की चू नाही. वाटले काहीतरी गडबड आहे. माझी दुसरी प्लेट संपत आली. आजोबा तिथेच उभे. तेवढ्यात मागून एक माणूस स्कुटीवर आला.

काळजी करू नकोस, बाबा सापडले!! कोणाशी तरी मोबाईलवर बोलत होता. गळ्यात ऑफिस बॅग, पायात साधी चप्पल, चाळीशीतला असावा तो, आणि त्याच्या चेहऱ्यावर त्याचे बाबा सापडल्याचा आनंद दिसत होता.!

त्याने गाडी बाजूला घेवून स्टँडला लावली.

काय बाबा आज पाणीपूरी का? खायची का अजून???

त्याने आजोबांना विचारले. आजोबांचे त्यावर काहीच उत्तर नाही. त्याने आजोबांना गाडीवर बसवले. व पाणीपुरीवाल्याला नम्रपणे विचारले की, आजोबांनी किती पुऱ्या खाल्लया आणि त्याचे पैसे देऊन टाकले. हे सगळे बघून मला नवलच वाटले.

हे आजोबा कोण आहेत तुमचे? मी विचारले.

वडील आहेत माझे. त्याचे उत्तर.

त्यांना काही त्रास आहे का? माझा पुढचा प्रश्न.

हो त्यांना अल्झायमर आहे.

अत्यंत शांतपणे त्याने सांगितले. त्याच्या बोलण्यात कुठेही दुःख, ताण, त्रास नव्हता. अगदी सहजतेने तो बोलत होता.

मग हे आजोबा असे कुठेही जातात का?

हो, आत्ताच बघा ना, पाच किलोमीटर चालत आलेत.

मी शॉकच झालो. मग तुम्ही यांना शोधता कसे?मी विचारले. आम्ही यांच्या खिशामध्ये कायम एक मोबाईल ठेवतो आणि त्यात एक GPS ट्रॅकर लावला आहे. त्याच्या साहाय्याने शोधतो ह्यांना मी.

असे वारंवार होत असेल मी आश्चर्याने विचारले.

तो स्मितहास्य करून म्हणाला महिन्याला एक दोन वेळेस

काळजी घ्या आजोबांची! बाप रे काय हा वैताग मी बोललो. त्यावर तो गृहस्थ म्हणाला, बाबाही मी लहानपणी खेळायला गेलो की मला शोधून आणायचे ,यात्रेत हरवलो तर शोध शोध शोधायचे. .... त्यात काय येवढं. त्याने त्याच्या वडिलांना व्यवस्थित गाडीवर बसविले आणि निघून गेला.

खूप काही शिकण्यासारख होतं त्या माणसाकडून. इतका दुर्दम्य आजार वडिलांना असून सुद्धा किती शांत होता तो. बिलकुल चिडचिड नाही की कुठल्याच प्रकारचा मनस्ताप नाही.

उतारवयात आपल्या वडिलांना लहान बाळाप्रमाणे सांभाळणाऱ्या त्या माणसाला मनोमन सलाम ठोकून मी पुढे निघालो... खरंच आपल्यालाही जगता येईल का हो असं.!!

## सार्वजनिक गणेशोत्सवामागील उद्देश आणि बदललेले स्वरूप !

मनुष्य हा मुळातच उत्सवप्रिय प्राणी असल्याने कोणताही आनंद इतरानसोबत साजरा करण्यात त्याला अधिक रुचि असते. त्यामुळे आपल्याकडे धार्मिक आणि राष्ट्रीय सण तसेच उत्सव अत्यंत उत्साहाने साजरे होतात. नुकताच साजरा झालेला दहीहंडी उत्सव आणि त्याला प्राप्त झालेले व्यापक स्वरूप हा त्याचाच एक भाग आहे. लोकांच्या अतिउत्साहामुळे आणि धार्मिक शिक्षणाच्या अभावामुळे सध्या धार्मिक उत्सव साजरा करताना त्यामागील उद्देश विचारात घेतला जात नाही किंवा त्याला दुय्यम स्थान दिले जाते परिणामी त्या उत्सवाचा केवळ इव्हेंट बनू लागला आहे. दहीकाला उत्सवाचे तेच झाले आहे आणि सार्वजनिक गणेशोत्सव सुद्धा हळूहळू त्या दिशेने वाटचाल करू लागला आहे. आजमितीला सार्वजनिक गणेशोत्सव केवळ मुंबई, ठाणे आणि पुणेपुरता मर्यादित राहिला नसून राज्यातील सर्वात मोठा उत्सव बनला आहे. देशातील अनेक राज्यांतही तो उत्साहाने साजरा होऊ लागला आहे. यानिमित्ताने राज्याच्या अर्थकारणात दरवर्षी मोठ्या प्रमाणात उलाढाल होत असते. शहरासारख्या ठिकाणी या दिवसांत एवढ्या मोठ्या प्रमाणात भाविकांची वर्दळ असते की कधी रात्र सुरु झाली आणि कधी संपली याचा पत्ताही लागत नाही. शहरातील सार्वजनिक गणेशोत्सवाची मजा लुटण्यासाठी देश विदेशातून भाविक आणि पर्यटक मोठ्या प्रमाणात शहरांत दाखल होतात. देशाच्या सीमा ओलांडून साता समुद्रापार ज्या ज्या ठिकाणी मराठी माणूस वसला आहे त्या त्या ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव आज साजरा होऊ लागला आहे. मुळात 'कुटुंबातील मंडळींनी एकत्र येऊन साजरा करायचा एक सण असलेली श्री गणेशचतुर्थी सार्वजनिक उत्सव कशी बनली', हे समजून घेऊया.

सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रणेते म्हणून लोकमान्य टिळक यांना ओळखले जाते. एकदा लोकमान्य टिळकांनी ह.भ.प. श्रीपतीबुवा भिंगारकर यांना विचारले, 'मी स्वराज्यप्राप्तीसाठी प्रयत्न करीत आहे; पण ईश्वरी साहाय्यावाचून कोणतेही कार्य शेवटास जात नाही. तेव्हा या स्वराज्याच्या कार्याचा राष्ट्रभर प्रसार होण्यासाठी कोणाची आराधना करावी ?' बुवा म्हणाले, 'तुम्ही श्री गणपतीची पार्थिव पूजा चालू करा, म्हणजे तुमचे सर्व हेतू सिद्धीस जातील.' त्यावर लोकमान्य टिळक म्हणाले, 'मी एकट्याने अशी पूजा करून भागणार नाही. राष्ट्रभर ती सर्वांनी केली पाहिजे. आपल्याकडे भाद्रपद शुद्ध चतुर्थीस घरोघर पार्थिव गणपतीची पूजा करायचा पूर्वीचा प्रघात आहेच. तो आता राष्ट्रभर चालू करूया.' तेव्हापासून लोकमान्यांच्या प्रेरणेने सार्वजनिक गणेशोत्सव चालू झाला ! यावरून आपल्याला 'सार्वजनिक गणेशोत्सव चालू होण्यामागील मूळ प्रेरणा राष्ट्रहित आणि ईश्वरभक्ती ही आहे', हे स्पष्ट होते.

श्री गणेशाच्या हा उत्सव सार्वजनिक असला तरी तो धार्मिक उत्सव आहे. राष्ट्रकार्याला धार्मिक अधिष्ठान असावे आणि त्यातून राष्ट्रजागृतीचा संदेश लोकांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने लोकमान्य टिळकांनी हा उत्सव सुरु केला. आजमितीला हा उद्देश लोप पावून उत्सवात अपप्रवृत्ती शिरल्या आहेत. अर्थात वर नमूद केलेले प्रकार हे काही ठिकाणीच पाहायला मिळत असले तरी ते आपल्या धार्मिक उत्सवाला गालबोट लावणारे असल्याने ते थांबायला हवेत. आज हिंदूमध्ये धर्मशिक्षणाचा अभाव असल्याने उत्साहाच्या भरात ते काय करत आहेत हे त्यांच्याच लक्षात येत नाही. आपल्या उत्सवात शिरलेल्या या चुकीच्या प्रथांना उखडून उत्सव सात्विक आणि लोकहिताचा व्हावा यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची आज नितांत आवश्यकता आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

### मांजरा धारण...

झाल्याने धरण लवकर भरले असून त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. धरण भरल्याने सिंचन व पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटला आहे. दरवर्षी धरण भरावे यासाठी वरुणराजाकडे प्रार्थना केली आहे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी धरणाचे अभियंता यांच्याशी संवाद साधला. सध्याच्या घडीला धरणाचे चार दरवाजे उघडण्यात आले असून नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. नदीकाठच्या शेतकऱ्यांनी सुरक्षिततेसाठी दक्षता घ्यावी, असे आवाहन करताच यासंदर्भातील सर्व सूचना शासनस्तरावरून देण्यात आल्याचेही आ. मुंदडा यांनी सांगितले.

### चक्क पाझर...

मंडळाधिकारी यांनी पंचनामा केला असता अनेक गंभीर बाबी समोर आल्या असून आता केज प्रशासन या प्रकरणी काय कारवाई करणार याकडे लक्ष लागून आहे. विशेष म्हणजे तलावात खदाण असल्याचे दिसून आले.त्याशिवाय एक खडीक्रे शरही त्याठिकाणी सुरू असल्याचे पंचनाम्यातून समजून आले.विशेष म्हणजे ज्याठिकाणी हे तलाव आहे आणि खडीक्रेशर सुरू आहे त्या जमिनीच्या सातबारावर महाराष्ट्र शासन नाव असल्याने सदरील खदाण आणि खडीक्रेशर महाराष्ट्र शासनाच्या जागेवर सुरू असल्याचे स्पष्ट दिसून येत असून तलावात अक्षरश... ४० ते ५० फुटाचे खड्डे अवैध गौणखनिज उपसा करून झाल्याचे दिसून आले आहे. विशेष म्हणजे तलावात मुरूमाचे ढिगही आढळून आले असून एकंदरीत त्या पाझर तलावातून बेसुमार उपसा झाल्याचे दिसून येत असून प्रशासनाने संबंधितांवर गंभीर कारवाई करण्याची गरज आहे.

ग्रामस्थ आणि पाळीवप्राण्यांचे जीव धोक्यात!

पाझर तलावातून गौणखनिज उपसा करायचा असेल तर संबंधित विभागातून परवानगी घेणे गरजेजे आहे.तसेच राज्यमहामार्गाचे काम असेल तरच संबंधित विभाग तलावातून गौणखनिज उपसा करण्याची परवानगी देते. परंतु संबंधितांनी कोणतीही परवानगी नसताना तलावातून बेसुमार गौणखनिज अवैध उपसा केला. त्यातून तलावात ४० ते ५० फुटाचे खड्डे झाले.या खडड्यांमुळे पाणी पिण्यासाठी येणाऱ्या पाळीवप्राण्यांचे व इतर प्राण्यांचे जीव धोक्यात आले असून यातून ग्रामस्थांचीही मोठी जीवित हानी होवू शकते.यासाठी प्रशासनाने अवैध मुरूम उपसा करणाऱ्या व खडीक्रेशरखवाल्यावर गंभीर कारवाई करण्याची गरज असून विशेष म्हणजे मंडळाधिकारी यांनी याप्रकरणी स्पष्ट पंचनामा करून सर्व बाबी नमुद केलेल्या आहेत. त्या दृष्टीकोनातून प्रशासन याप्रकरणी काय कारवाई करणार याकडे विशेष लक्ष राहणार आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

### भरपावसात एलसीबी ...

एलसीबीला आदेशित केले आहे. या अनुषंगाने शनिवारी दि.१६ रोजी एलसीबीला गुप्त माहिती मिळाली की, म्हाळस पिंपळगाव शिवारात गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू उपसा सुरू आहे. या माहिती वरून पथकाने सदरील ठिकाणी भर पावसात छापा टाकला. त्यावेळी पोलिसांना बघून वाळू उपसा करणारे टॅक्टर, रोडर घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला पण पोलिसांनी त्यांचा पाठलाग केला असता टॅक्टर व रोडर सोडून चालक अंधाराचा फायदा घेत जवळच्या असलेल्या शेतातून पळून गेले. या पथकाने टॅक्टर रोडर असे ऐकून ९ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला . याप्रकरणी पडून गेलेल्या दोन्ही चालकांवर गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार विकास राठोड, राहुल शिंदे, अंकुश वरपे, नितीन वडमारे, पोलीस अमलदार अर्जुन यादव, अश्फाक सय्यद, मनोज परजने यांनी केली आहे.

### नशामुक्तीसाठी पोलीस...

अधीक्षकांसह पोलीस विभागातील विविध अधिकारी, पत्रकार, समाजसेवक आणि विविध संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले. रॅलीचे प्रमुख उद्दिष्ट युवकांमध्ये नशाबंदीबाबत जागरूकता निर्माण करणे आणि समाजात नशा मुक्तीचा संदेश पोहचवणे होते. रॅलीमध्ये सहभागी झालेल्यांनी विविध रस्त्यांवरून मार्गक्रमण करत नागरिकांना नशापासून दूर राहण्याचे महत्त्व सांगितले. बीड शहर व जिल्ह्यातील नागरिक, प्रतिष्ठित व्यक्ती,व्यापारी, समाजसेवक, पोलीस अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी स्वतः मोटरसायकलवर बसून रॅलीत सक्रिय सहभाग घेतला आणि सहभागींचा उत्साह वाढविला. रॅलीतून नागरिकांमध्ये नशापासून दूर राहण्याचे महत्त्व समजावून सांगितले गेले व जनजागृतीला चालना मिळाली.

५ व १० किलोमीटर अशा दोन गटांत विभागलेल्या या स्पर्धेत पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, पोलीस कर्मचारी, समाजसेवक, पत्रकार, विद्यार्थी व हजारो युवकांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. नशाबंदीची हाक देत, व्यसनमुक्त समाजाचे सामर्थ्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचा संदेश या मॅरेथॉनमधून देण्यात आला. व्यसनमुक्त जीवनशैली हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली आहे. नागरिकांनी एकजुटीने या मोहिमेत सहभागी

◆ पान ९ वरून पुढे...

व्हावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी केले. हा उपक्रम बीड जिल्हा पोलीस दलाच्या कटिबद्धतेचे प्रतीक ठरला असून व्यसनमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी जनतेने दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाने या चळवळीला नवे बळ मिळाले आहे. बीड जिल्हा पोलीस जनतेच्या सुरक्षेसाठी,व्यसनमुक्त समाजासाठी मॅरेथॉन रॅली घेऊन समाजासाठी अनोखा संदेश दिल्याने सर्वच स्तरातून पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे कौतुक होत आहे.

### ग्रामीण भागाला...

लोकवर्गणीतून रस्ते करण्याचे वेळ आली असून एकंदरीतच शासनाच्या घोषणा व योजना केवळ कागदावरच राबवले जात असून वस्तुस्थिती वेगळी असल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी बोलून दाखवली.बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील सरपंच विश्वंभर गिरी यांनी महाजनवाडी ते बोरखडे पंतप्रधान पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्याच्या दुरावस्थेसाठी वारंवार शासन दरबारी पाठपुरावा करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने अखेर ग्रामपंचायत मार्फत रस्ता दुरुस्तीचे काम सुरू केले आहे.

पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्याची ग्रामपंचायत मार्फत दुरुस्ती : विश्वंभर गिरी , सरपंच महाजनवाडी

बोरखेड -महाजनवाडी पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्याची थातुरमातुर दुरुस्ती केली जाते. प्रशासनाकडे वारंवार निवेदनाद्वारे पाठपुरावा करूनही प्रशासन दुर्लक्ष करत आहे. ग्रामस्थांना दुधदुभते, बाजारहाट, शालेय विद्यार्थी, दवाखाना याठिकाणी जाण्यासाठी अडचणी येत असल्याने शेवटी ग्रामपंचायत मार्फत रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम सुरू केले असल्याचे महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी यांनी सांगितले.यावेळी ग्राम पंचायत सदस्य विशाल घरत,बबन घरत, संजय घरत, शंकर घरत, ऋषिकेश घरत आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

सरकारच्या योजना कागदावरच; लोकसहभागातून रस्ते करण्याची ग्रामस्थांवर वेळ दुर्दैवी : डॉ.गणेश ढवळे

सरकार मातोश्री पाणंद रस्ते योजना असेल अथवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी गावपातळीवर सिमेंट काँक्रीट रस्ते करण्याची घोषणा असेल या घोषणा केवळ कागदावर राहत असून ग्रामीण भागातील लोकांना पावसाळ्यात शेतमाल, बि-बियाणे, दुध दुभते, बाजारहाट,शाळकरी मुलं दवाखाने आदींसाठी रस्त्यासाठी वारंवार शासनाकडे पाठपुरावा करूनही निधी उपलब्ध करून न दिल्याने अखेर लोकसहभागातून रस्ते करण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे. ही बाब अत्यंत दुर्दैवी असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ. गणेश ढवळे यांनी दिली.

◆ पान ४ वरून पुढे...

### शेतकऱ्यांची कर्जमाफी...

विजयकुमार घाडगे यांनी केले.ते बीडमध्ये शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी बीड जिल्हाध्यक्षा अशोक रोमन यांच्यासह छावाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना विजयकुमार घाडगे म्हणाले की, राष्ट्रवादीच्या गुंडांनी माझ्यावर हल्ला केल्यानंतर चार दिवसाच्या उपचारांनंतर मी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. तेव्हा अजित पवार म्हणाले ज्या पदाधिकाऱ्यांनी हल्ला केला त्यांना पुन्हा पक्षात घेणार नाही. माणिकराव कोकाटे यांच्या बद्दल योग्य तो निर्णय घेऊ असे आश्वासन दिले. कृषी मंत्री यांच्या बददूल अजित पवार यांनी निर्णय घेतला मात्र, आमच्या जखमा ओल्या असताना आमच्यावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या गुंडांना पक्षाच्या फादर बॉडीत घेऊन अजित पवार यांनी नविन पायंडा पाडला आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये असा समज झाला आहे. की शेतकऱ्यांच्या विरुध्द राष्ट्रवादी अजित पवार गट आहे. शेतकऱ्यांच्या पोराला मारहाण करण्यासाठी अजित पवार यांनी गुंडांची टोळी ठेवली आहे. जशास तसे उत्तर छावा संघटना देत आहे. मात्र आम्ही या सरकारकडून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवून त्याचा बदला पूर्ण करणार आहोत. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सात बारा कोरा करण्याचे दिलेले आश्वासन आम्ही पूर्ण करूण घेणार आहोत. जर शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवले नाही तर नेत्यांना गाव बंदी करणार आहोत. असे विजयकुमार घाडगे म्हणाले. या पत्रकार परिषेदेला अखिल भारतीय छावाचे बीड जिल्हाप्रमुख अशोक अण्णा रोमन, संभाजीनगर जिल्हाप्रमुख अशोक मोरे पाटील, लातूर जिल्हा प्रमुख दीपक नरवडे, जालना जिल्हाप्रमुख संदीप ताडगे यांच्यासह विद्यार्थी आघाडी प्रमुख पप्पू लांडे पाटील, शहर प्रमुख सचिन हरणमारे, पप्पू शिंदे, पप्पू मस्के पाटील, दत्ता काशीद, दत्ता साळुंके, शंकर,श कुरळे, बाळू कदम, विठ्ठल अण्णा काळे, सिद्दिकी फारुकी, वाजेद खान, अविनाश हातागळे, अमोल अंकुटे, सतीश मस्के, गिरीश करवा आदी उपस्थित होते.

### आंतरजिल्हा जबरी...

आल्यानंतर बीड शहर डीबी पथकाचे पीएसआय महेश जाधव आणि पोह राठोड, बावनकर, पोअ राम पवार यांनी त्यांचा शहरभर शोध घेतला असता त्यांना एके ठिकाणी त्यांची गाडी लावलेली आढळून आली. त्या ठिकाणी मग सापळा रचला... परंतु दिवसभर ते त्या सापळ्यामध्ये अडकले नाही.. परंतु रात्री साडेदहाच्या सुमारास ते अलगद त्या सापळ्यात अडकले

◆ पान ४ वरून पुढे...

आणि तिघेही आरोपी पोलिसांच्या हाती लागले. या संपूर्ण प्रकरणांमध्ये पुणे पोलीस आणि बीड शहर पोलीस यांचा समन्वय अनोखा ठरला.. अशाप्रकारे समन्वयातून अंतर जिल्हा गुन्हे करणारी टोळी ही पकडण्यात आलेली आहे.. येथेही त्यांचा अशाच प्रकारचा गुन्हा करण्याचा उद्देश होता हे तपासा स्पष्ट झाले आहे. ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक श्री नवनीत कॉंवत यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक श्री शितल कुमार बल्लाळ यांचे बीड शहर डीबी पथकातील पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पोह राठोड, पोह बावनकर, पोअ पवार केली आहे.

### नुकसानग्रस्त भागाचे....

तातडीने पंचनामा करून शेतकऱ्यांना मदत मिळाली पाहिजे, असे त्या म्हणाल्या. पुढे बोलताना खा. पाटील म्हणाल्या की, शासनाने तत्परतेने कार्यवाही केली नाही तर शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक बिकट होईल. त्यामुळे प्रशासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणे ही काळाची गरज आहे. शासनाच्या विविध योजनांमधून तसेच आपत्ती व्यवस्थापन निधीतून तातडीने मदत देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहून सर्व स्तरांवर लढा देण्याचा निर्धार खा. रजनीताई पाटील यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव बांधील असून, नुकसान भरपाई मिळेपर्यंत पाठपुरावा करत राहणार असल्याचे सांगितले.

### तलवाडा गाव...

वेढला आसल्याने बस स्थानक कडे जाणा-या शासकीय बसेस सह खाजगी वाहन चालकांना तारेवरची कसरत करत वाहन चालावे लागत आसल्याचे आणेक वेळा दिसुन आलेले आहे. आणेक बस चालकांनी बसेस ऊभे करुन तलवाडा येथील पत्रकार व लोकप्रतिनिधींना या रस्ता रुंदी करना बाबत विनंती केलेली आहे. या रस्त्याच्या आतिक्रमण धारकांनी तलवाडा गाव तलाव संरक्षण भीत कोरुन गाव तलावाच्या संरक्षण भीतीला धोका तर निर्माण केलाच आहे जेणे करुन गाव तलाव फुटन्याचा धोखा वाढलेला दिसुन येत आसतांनाच संरक्षण भीत ते मुख्य डांबरी सडक पर्यंत आतिक्रमण वाढल्याने रहदारीला मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत आसल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते. याच मुख्य डांबरी रस्त्याने सर्व शासकीय कार्य लये शाळा कालेज शासकीय रुग्णालय बस स्थानक

◆ पान ४ वरून पुढे...

बँका सर्व याच रस्त्यावर आसल्याने मोठी दुर्घटना होण्याची शक्यता या निमित्ताने वर्तवली जात असुन संबधित प्रशासन एखांद्याचा जिव गेल्यावर हे आतिक्रमण हाटवणार का असा सवाल या निमित्ताने उपस्थित होऊ लागला आहे.

### स.पो.नि.वर्षा...

सर,श्री.कापले सर ,श्री.केदार सर, उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,हिंदी विषयाचे जेष्ठ अध्यापक श्री.डोईफोडे सर अदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. नशा मुक्ती या विषयावर १५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्यदिनी वडवणी पोलीस दलाच्या वतीने चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले या स्पर्धेचा श्री.एम.बी.राऊत सर यांनी निकाल घोषित केला यामध्ये प्रथम क्रमांक कु.नारायणी भागवत तर द्वितीय क्रमांक कु. आलीया रफिक शेख व तृतीय क्रमांक कु.मायकर शिवाजंली तसेच कु. खाडे ऐश्वर्या, चि.अथर्व शेळके यांनी उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला या विद्यार्थ्यांचा कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सहाय्यक पोलीस निरीक्षक व्ही.पी.व्हगाडे मॅडम व कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम यांच्या शुभहस्ते नशा मुक्ती अभियानाचे पारितोषिक देऊन त्यांचा गौरव केला त्यानंतर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या तथा समुपदेशिका सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती व्ही.पी.व्हगाडे मॅडम यांनी नशा मुक्ती विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करून समुपदेशन केले व त्यांनी नशा मुक्तीची शपथ विद्यार्थ्यांना दिली नशा पासून दूर राहा असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. तशाच कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम यांनी चित्रकला स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचं अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या व सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती व्ही. पी.व्हगाडे मॅडम यांनी नशा मुक्ती विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून समुपदेशन केल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपप्राचार्य मस्के सर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंडील जी.पी.यांनी केले व कार्यक्रमाचे आभार पर्यवेक्षक धाईतिडक सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

### बीड शहरातील...

१०० कोटींचा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. अजितदादा पवार स्वतः निधी वितरणाबाबत बैठक घेणार असून, त्यानंतर मंजुरीची प्रक्रिया

◆ पान ४ वरून पुढे...

पूर्ण होईल. याशिवाय, शहराच्या विकासासाठी अलीकडेच ५ कोटी रुपये घंटागाड्यांसाठी, ७.५० कोटी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहासाठी, तसेच ६ कोटी टॅक्स सर्व्हेसाठी मंजूर झाले आहेत. दरम्यान, बीड मतदारसंघासाठी भरघोस निधी दिल्याबद्दल ना.अजितदादा पवार यांचे डॉ.क्षीरसागर यांनी आभार मानले आहेत.

### सोमवारी ह.भ.प...

रात्री ८ ते ९ यावेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रेमी महाराज मंडळींची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होत आहे. या चातुर्मास उत्सवा निम्मित सोमवार दिनांक १८/८/२५ रोजी रात्री ८ते९ या वेळेत ह भ प हनुमान महाराज शेळके वांगी ता बीड यांची प्रवचन सेवा होणार आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके काठवडेकर या फेसबुक अकाऊंट वरून होणारअसून, या चातुर्मास उत्सवात आपण सर्वांनी सहभागी होऊन श्री ज्ञानेश्वरी प्रवचन श्रवणनाच लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प माधव महाराज डाके यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### समाज सेवक...

स्थानी मोहन जगताप हे होते तर प्रमुख उपस्थितीत, सहाल चाऊस, खुर्शीद नाईक,नासेर खान,खलिल पटेल, मुफ्ती शब्बीर, जयदत्त नरवडे,धम्मानंद साळवे, ज्ञानेश्वर मेंडके मोबिन खान, मज्जिद भैय्या,नवाब पटेल व अन्य लोग होते, कार्यक्रमाचे सुत्रसंचालन फाउंडेशन चे उपाध्यक्ष इरफान मिर्जा यांनी केले व फांडेशन चे अध्यक्ष शेख शौकत यानी आपले वर्षभरात केलेले कामाचा सविस्तर माडला व जमात ए इस्लामी चे ता.अध्यक्ष माजेद खान सर यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले. या प्रसंगी काही प्रमुख उपस्थितानी आपले मत व्यक्त करत फांडेशन चे कार्यास शुभेच्छ दिले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्या साठी शेख शाहेद मनियार, शेख सलीम जरगर, शेख जमीर, सय्यद खैसर, शेख असद, सय्यद सत्तार टेलर, हबीब सिद्दीकी,मारुफ इनामदार,नाजेर,रय्यस चाउस, जुल्फिकार भाई,यावर,अज्जु भाई,ग़जमफर,सुमेर पटेल, आसीफ भाऊ, इमरान खान, मुफ्ती शबीर,अहमद भाई,अज़ीम,शफीक भाऊ,सुजात मिर्जा, माजेद रेंनशी,हाफेज़ रफिक,आफ्फान, बबलु शेख,साहिल शेख, गुड्डू लाला,तय्यब तांबोळी,तौसिफ सिद्दीकी,आमेर शेख,समीर शेख, अमजद शेख,आत्तीक कादरी,जुनेद शेख,ज़हिर सय्यद, मुद्दसिर ख़ान,आमिन शेख,उमर मिर्झा, मोहम्मद शेख,कैफ शेख,सोफियान यांनी कठोर परिश्रम केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाचा सावळा गोंधळ बबन शिंदेच्या बोगस शाळेवर अनुदानाची खैरात!

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांचा कारभार कसा अंदा धुंद आहे याचे एक अनोखे उदाहरण समोर आले आहे. दोन वर्षापासून वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या जिजाऊ पतसंस्थेचे मालक बबन शिंदे यांच्या मूकबधिर शाळेचा यु-डायस नंबर आणि इतर कागदपत्रे तसेच विद्यार्थी संख्या पुरेशी नसताना देखील समाज कल्याण अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर अनुदानाची खैरात केली आहे हा प्रकार म्हणजे आंधळं दळतय आणि कुत्र पीठ खातय असाच म्हणावा लागेल. ही शाळा कायमस्वरूपी बंद करून या शाळेतील विद्यार्थ्यांचे इतरत्र स्थलांतर करून समाज कल्याण अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी शिफारस समाज कल्याणचे संभाजीनगर विभागाचे उपायुक्त यांनी केली आहे.

तब्बल दोन ते अडीच वर्षांपूर्वी बीड सह पाच ठिकाणी शाखा असलेल्या जिजाऊ मासाहेब पतसंस्थेचे प्रमुख बबन शिंदे यांनी पतसंस्थेचा पैसा प्लॉटिंग व इतर व्यवसायात वापरल्याने फरार होण्याची वेळ त्यांच्यावर आली. त्यांनी पतसंस्थेच्या पैशाच्या जोरावर कोट्यावधी रुपयांची इन्व्हेस्टमेंट इतर क्षेत्रात केली त्या माध्यमातून त्यांनी शाळा कॉलेज देखील उभारले मात्र पतसंस्थेला टाळे लागल्यानंतर बबन शिंदे हे फरार होते. त्या काळात त्यांच्या जेवढ्या काही मालमत्ता आहेत त्या आर्थिक गुन्हे शाखेने न्यायालयाच्या आदेशावरून जप्त केल्या.

बबन शिंदे हे फरार आहेत आणि त्यांची पतसंस्था वादाच्या भोवऱ्यात आहे हे माहीत असताना देखील त्यांच्या वासनवाडी फाटा येथील मूकबधिर शाळेवर जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांनी व त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी अनुदानाची खैरात उधळली आहे बबन शिंदे फरार आहेत आणि त्यांच्या शाळेमध्ये पुरेशी विद्यार्थी संख्या नाही हे माहीत असताना देखील समाज कल्याण अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष करून या संस्थेला अनुदान देणे सुरूच ठेवले.

विशेष बाब म्हणजे मूकबधिर शाळेचे युनिट सुरू ठेवायचे असल्यास किमान विद्यार्थी संख्या ही ४० च्या आसपास लागते मात्र वासनवाडी येथील मूकबधिर शाळेत केवळ सात विद्यार्थी असल्याचे उपायुक्त यांनी केलेल्या तपासणीत उघड झाले. त्यानंतर या शाळेला यु-डायस नंबर असेल अथवा इतर परवानगी असतील त्या देखील नाहीत लायसन रिन्यू केलेले नाही अशा अनेक त्रुटी आढळून आल्या. विशेष बाब म्हणजे बीडच्या जिल्हा परिषद समाज कल्याण कार्यालयाने या सर्व बाबी कडे दुर्लक्ष करत संस्थेचे हित जोपासण्याचा प्रयत्न केला असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

समाज कल्याण विभागाचे छत्रपती संभाजी नगरचे उपायुक्त दीपक खरात यांनी समाज कल्याण आयुक्तांकडे पाठवलेल्या अहवालात ही शाळा कायमस्वरूपी बंद करून या शाळेत असलेल्या सात विद्यार्थ्यांना इतर शाळेमध्ये स्थलांतरित करावे तसेच एवढा सगळा सावळा गोंधळ असताना देखील त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या समाज कल्याण अधिकारी आणि त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी अशी शिफारस करण्यात आली आहे.

# स्वत:ची तुलना स्वत:शी करा: वैष्णवी बजाज

**• सिंदफणा शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा**

**माजलगाव । प्रतिनिधी**

स्वतःची तुलना स्वतःशी करा. इतरांशी स्पर्धा न करता आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवा आणि दररोज स्वतःच्या सुधारणेसाठी प्रयत्न करा, असे प्रेरणादायी आवाहन शाळेच्या माजी विद्यार्थिनी वैष्णवी बजाज यांनी सिंदफणा पब्लिक स्कूलमध्ये आयोजित स्वातंत्र्य दिन समारंभात केले.



सविस्तर वृत्त असे की, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सिंदफणा पब्लिक स्कूलने माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते ध्वजारोहणाची परंपरा कायम ठेवली. शाळेची माजी विद्यार्थिनी आणि सध्या पुणे येथे सनदी लेखापाल म्हणून कार्यरत असलेल्या वैष्णवी बजाज यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि मुख्य पाहुण्यांचा परिचय शाळेचे उपप्राचार्य राहुल कदम यांनी करून दिला.या देशभक्तीपर समारंभात शाळेच्या इयत्ता चौथीच्या प्रतिभावान विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचे अप्रतिम प्रतिबिंब दाखवणारे नाटक सादर केले. त्याबरोबरच हृदयस्पर्शी देशभक्तीगीते आणि नृत्य सादरीकरणांनी उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. अर्णव काळे, जागृती शिंदे, रुद्र कदम, गीतांजली जाधव, शौर्य देशमुख आणि रिया बजाज या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. त्यांच्या या सादरीकरणातून भारतीय वारसा, संस्कृती आणि स्वातंत्र्याचे खरे मूल्य सर्वांना अनुभवास आले.

शाळेचे प्राचार्य अन्वर शेख यांनी विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे अभ्यास करून यशस्वी व्हावे आणि पुन्हा याच शाळेत मुख्य पाहुणे म्हणून यावे असे आवाहन केले. या संदेशामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवी ऊर्जा आणि आत्मविश्वास निर्माण झाला. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शैक्षणिक विभाग प्रमुख जी.बी. ऑगस्टन, सुनिता सुरवसे, धनंजय सोमवंशी, अर्चना जाधव, जिजाराम गडाख, सखाराम जोशी, प्रदीप बुरकुल, देवेंद्र सोळंके आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी संस्थेचे कार्यकारी अधिकारी सुहास सोळंके आणि पालकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात 'नशा मुक्त भारत अभियान' अंतर्गत तंबाखू मुक्तीची शपथ

**नेकनूर । प्रतिनिधी**

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, नेकनूर येथील राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागयांच्याअंतर्गतन नशा मुक्त भारतअभियान अमली पदार्थ व्यसन व सेवनाविरुद्ध व जनजागृती करण्याच्या उद्देशाने १५ ऑगस्ट रोजी सर्व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . ढास डी. के. यांच्या उपस्थितीत शपथ देण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.यावर्षीची थीम 'विकसित



भारत का मंत्र, भारत हो नशे से स्वतंत्र' असून यासोबतच स्वतंत्र दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. तंबाखूजन्य पदार्थ, सेवन करू नये या पदार्थ सेवनामुळे कर्करोग सारखे अनेक आजार मानवास होत आहेत. तसेच आपले आरोग्य चांगले राहण्याकरता नशा मुक्ती झालीच पाहिजे असे आव्हान प्राचार्य डॉ. ढास डी के. यांनी केले. रासेयो स्वयंसेवकांनी विरोध करावा धूम्रपान मनाई करावी. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी. के.,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.इनकर व्ही.एस.,प्रा.रामरूले डी.के., सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. मुजावर एस. टी. महाविद्यालयातील

# माऊली ज्ञानोबारायांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ५१ ज्ञानेश्वरी ग्रंथ घरपोच वाटपाचा भक्तीमय वातावरणात शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**

साधकांचे मायबाप, अनाथांची माय, विश्वमाऊली श्री ज्ञानोबारायांच्या सातशे पन्नासाव्या जन्मशताब्दी वर्षा निमित्त श्री.ज्ञानेश्वरी ग्रंथाचा प्रचार प्रसार व्हावा या उद्देशाने एकावन्न श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ मोफत व घरपोच वाटप उपक्रमाचा आज माऊली ज्ञानोबरायंच्या सातशे पन्नासाव्या जन्मदिनी म्हणजेच श्रावण वद्य अष्टमी अर्थात गोकुळाष्टमी , स्वातंत्र्यदिन व माऊली ज्ञानोबाराय जन्मदिन अशा तीन शुभ पर्वावर मोठ्या उत्साहात व आनंदात शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमासाठी आज बीड शहरातील यशवंत नगर



येथील परमार्थ प्रेमी व कॅनरा बँकेचे निवृत्त व्यवस्थापक श्री.मुकुंदराव भुतपल्ले काका यांना पहिल्या निवडीचा मान मिळाला. त्यांच्या यशवंत नगर येथील निवासस्थानी या उपक्रमाचा शुभारंभ झाला. भूतपल्ले काका यांच्या अंगणापासून घरापर्यंत माऊली ज्ञानोबरायांच्या जय घोषात ज्ञानदेव तुकारामांच्या गजरात ज्ञानेश्वरी ग्रंथाची मिरवणूक काढण्यात आली. उपक्रमाचे संयोजक माधव महाराज डाके यांच्या हातून मुकुंद भुतपल्ले व सौ. कांताताई यांच्या हाती ज्ञानेश्वरी ग्रंथ सोपवण्यात आला.यानंतर श्री.ज्ञानेश्वरी ग्रंथाची गंध, अक्षदा, पुष्पहार हळदी कुंकू, बुक्का यांनी पूजा करण्यात आली . माधव महाराज डाके यांनी ज्ञानेश्वरीतील पहिल्या अध्यायातील पहिल्या ओवीवर ज्ञानेश्वरी ग्रंथाचे महिमान व उपक्रमाचा उद्देश वर्णन करणारे प्रवचन केले. या कार्यक्रमास मळापुरी येथील श्रीराम गडाचे महंत .ह.भ.प. गोकुळ महाराज तुपे शास्त्री व डाके महाराजांचे पारमार्थिक मार्गदर्शक .ह भ.प. मोहन महाराज खरमाटे, किसन महाराज माने, निवृत्त पी.एस.आय. मेडे साहेब, दै.चंपावती पत्र चे पत्रकार महादेव (नाना) साळुंके महाराज

# गंगाभारती पतसंस्थेच्या अपहार प्रकरणी ठेवीदारांची अजित दादांकडे धाव : ठेवीदारांना दिलासा, दोषींवर कारवाईचे आश्वासन

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील गंगाभारती महाराज ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था येथे झालेल्या कोट्यवधींच्या अपहार प्रकरणामुळे ठेवीदारांच्या हातचे पैसे अडकले असून, ठेवीदारांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, व्यवस्थापक व संचालक मंडळ मोकाट फिरत असून, संबंधितांवर गुन्हा दाखल असला तरी दोन वर्षांपासून ते फरार आहेत. यामुळे बीड पोलिसांच्या निष्क्रियतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. १३ मार्च २०२४ रोजी मांजरसुंबा पिंपळवाडी



शाखेत अपहार प्रकरणी नेकनुर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं. ००४५/२०२४ दाखल करण्यात आला होता. करचुंडी, लिंबागणेश, मांजरसुंबा, चौसाळा व बीड पिंपळवाडी या शाखांतील ठेवीदारांचे सुमारे ५ ते ६ कोटी रुपये अडकलेले आहेत. या गंभीर प्रकरणात ठेवीदारांचे हक्क अबाधित राहावेत यासाठी युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली ठेवीदारांनी स्वातंत्र्य दिनादिवशी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा दिला होता. यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांची ठेवीदारांसह हरिओम क्षीरसागर यांनी भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले. निवेदनातील मुख्य मागण्या : गुन्हा दाखल असलेल्या सर्व आरोपींना तात्काळ अटक करावी. संचालक व शाखाधिकारी यांच्यावरही गुन्हे दाखल करावेत. ठेवीदारांचे पैसे परत करण्याची तातडीने कार्यवाही करावी. प्रशासकांनी निष्क्रीय राहू नये; प्रभावी कारवाई करणे आवश्यक. शासकीय लेखा परीक्षकांनी संस्थेच्या सर्व शाखांचा लेखापरीक्षण अहवाल तात्काळ तयार करून निबंधक कार्यालयात दाखल करावा.

# भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे सचिव अँड. व्ही.बी. मगर आणि आनंद छात्रदायांमध्ये अध्यक्ष बी.एस. धुतालमल यांच्या शुभहस्ते आणि या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला.



या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा अभियानांतर्गत दिनांक १३ ऑगस्ट २०२५ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीमध्ये भारतीय तिरंगा ध्वजारोहण कार्यक्रम मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव या अंतर्गत आंतरशालेय पातळीवर रांगोळी चित्रकला, निबंध, वकृत्व, देशभक्ती गीत गायन या स्पर्धेचे आयोजन प्रार्थमिक आणि माध्यमिक गटांमध्ये करण्यात येऊन यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. याप्रसंगी नयन मनोहर सामूहिक विद्यार्थ्यांची कवायत आणि डंबेल्स खवायत आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमास प्रा. नारायण शिंदे उपस्थित होते

# पोलिस अधिक्षक कांवत यांचा व्यापारी महासंघाच्या वतीने गौरव

**• व्यसनमुक्ती अभियानांतर्गत आयोजीत रॅलीत सहभाग**

**बीड । प्रतिनिधी**

पोलिस दलाकडून व्यसनमुक्तीसाठी पुढाकार घेतला जात आहे. याकरिता कायदेशीर कारवाईबरोबरच जनजागृती देखील केली जात असून याबद्दल पोलिस अधिक्षक नवनित कांवत यांचा जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने कार्याध्यक्ष अशोक शेटे यांनी गौरव केला. बीड जिल्हा पोलिस दलाच्या वतीने रविवारी व्यसनमुक्ती अभियानांतर्गत बीड शहरात मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन




करण्यात आले होते. यामध्ये हजारो स्पर्धकांनी सहभाग करत व्यसनमुक्तीची ही चळवळ बळकट केली. पोलिस दलाकडून या अभियानांतर्गत विविध उपक्रम राबवले जात असून याबद्दल जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने पोलिस अधिक्षक नवनित कावत यांचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोक शेटे, लईक अहमद तसेच योगा दीपमाळ ग्रुपचे जीतेंद्र बोरा यांची उपस्थिती होती. नशामुक्त बीडसाठी जिल्हा पोलिस दल आणि विविध सामाजिक संस्था अशा उपक्रमांद्वारे एकत्र काम करीत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. याप्रसंगी बीड चे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, अधिकारी वर्ग,व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्ह्यातील विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला. सामाजिक न्याय भवन परिसरात आयोजित कार्यक्रमात यावेळी आमदार सर्वश्री संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, जिल्हा परिषदेचे मुख्य



कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांच्यासह सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी यांची उपस्थिती होती. जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी मध्ये पोलीस विभागातील पोलीस उपनिरिक्षक श्रीमती पल्लवी भाऊसाहेब जाधव, पोलीस हवालदार अशोक बापुराव शिंदे, पो.ह. प्रदिप निवृत्ती येवले, पोलीस उपनिरिक्षक श्रीराम रामदास खटावकर, पो.ह. शेख आसेफ शेख शमीम महसूल विभागातील निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, नायब तहसीलदार सचिन सुरेशराव देशपांडे, ग्राम महसूल अधिकारी सलीम शेख, संघर्षकुमार ओवे, सहायक महसुल अधिकारी जितेंद्र साहेबराव जाधव, राहुल रामनाथ बलाढ्ये.

## जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती. एस.डी. सोनी, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १११४/२०२५**

**बाबुराव बळीराम नाईकवाडे व ईतर विरूध्द निरंक**

अर्जदार- १. बाबुराव पि. बळीराम नाईकवाडे, वय ३८ वर्षे, धंदा - उसतोड मजुरी, २. प्रतिक्षा पि. बाबुराव नाईकवाडे वय १४ वर्षे, धंदा - शिक्षण, अज्ञान, पालनकर्ते वडील, बाबुराव नाईकवाडे, रा. मु. पो. कोठारबन, ता. वडवणी, जि. बीड, ह.मु. मु. पो. बोरदेवी, ता. जि. बीड.

विरुध्द निरंक

**मागणी - बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत हौसाबाई भ्र. बळीराम कळसाने, यांचा मृत्यु झाला, वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

यांन

ज्याअर्थी मयत हौसाबाई प्र. बळीराम कळसाने, यांचा मृत्यु दिनांक १२ / ११ / २०२४ रोजी झाल आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत हौसाबाई भ्र. बळीराम कळसाने, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत हौसाबाई भ्र. बळीराम कळसाने, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/०८/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २०/०९/२०२५ आहे.**

**मार्फत- ॲड. घुगे जी. एस.**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १११५/२०२५**

अर्जदार- १) शिवाजी पि. काशिनाथ घुगे, वय ६१ वर्षे, धंदा-शेती, (२) परमेश्वर पि. उत्तरेश्वर घुगे, वय ३८ वर्षे, धंदा-शेती, ३) रामेश्वर पि. उत्तरेश्वर घुगे, वय-३५ वर्षे, धंदा-शेती, (४) सुदर्शन पि. उत्तरेश्वर घुगे, वय-३२ वर्षे, धंदा शेती, ५) गंगुबाई भ्र. उत्तरेश्वर घुगे, वय ५५ वर्षे, धंदा-शेती, वरील १ ते ५ रा. बोरफडी, ता. जि. बीड.

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक अर्जदार हे भारतीय आहेत

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नाम काशिनाथ अप्पाराव घुगे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नाम काशिनाथ अप्पाराव घुगे, रा. बोरफडी, ता. जि. बीड हे दिनांक २०/०६/२००१ रोजी बोरफडी, ता. जि. बीड येथे मयत झालेलं आहेत. अर्जदार क्र. १ हे मयताचा मुलगा आहे. अर्जदार क्र. २ ते ४ हे मयताचे नातु आहेत व अर्जदार क. ५ ही मयताची सून आहे. मयताची पत्नी १५ वर्षापुर्वी मयत झाली आहे. मयताचा मुलगा उत्तरेश्वर काशिनाथ घुगे हा दिनांक १७/१०/२०१८ रोजी राहते घरी मयत झाला. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचं असंही म्हणणं आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचं असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नांद घ्यावी. पुढील दिनांक २०/०९/२०२५

आज दिनांक १६/०७/२०२५ गंजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**मार्फत- ॲड. घुगे जी. एस.**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### शेतकरी परदेश अभ्यास दौऱ्याकरीता प्राप्त अर्जांची सोडत प्रक्रिया

बीड । प्रतिनिधी

राज्यातील शेतकऱ्यांचे केवळ उत्पादन व उत्पादकता वाढविणे हे ध्येय यापुढे न राहता उत्पादित होणाऱ्या शेतमालाची दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतीशी निगडीत घटकांबाबत जगात वेळोवेळी होत असलेले बदल, विकसीत होत असलेले तंत्रज्ञान हे शेतकऱ्यांपर्यंत त्यांच्या गरजेनुरुप योग्यवेळी पोहचविणे आणि त्यासाठी आवश्यक सहाय्य व सोयीसुविधा पुरविणे निकडीचे आहे. कृषि विस्तार कार्यक्रमामध्ये शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्याकरीता करावयाच्या विविध उपाययोजनांसाठी कृषि विभागाकडुन राज्यातील शेतकऱ्यांचे परदेश दौरे ही योजना राबविणेत येत आहे. तसेच बीड जिल्हयाकरीता महिला-१, केंद्र/राज्य कृषि पुरस्कार प्राप्त/पिकस्पर्धा विजेते शेतकरी-१, इतर शेतकरी-३ असे एकुण ५ शेतकऱ्यांचा देशाबाहेरील अभ्यास दौरे बाबत लक्षांक प्राप्त आहे. त्यानुसार परदेश अभ्यास दौऱ्याकरीता इच्छुक शेतकऱ्यांचे प्रस्ताव तालुका कृषि अधिकारी मार्फत मागविण्यात आले होते. प्राप्त अर्जाची संख्या लक्षांका पेक्षा जास्त प्राप्त असल्याने परदेश अभ्यास दौरा मार्गदर्शक सूचना सन २०२५-२६ नुसार सोडत पद्धत अवलंबावी असे निर्देशित केले आहे. त्यानुसार प्राप्त अर्जांमधून सोडत पद्धतीने निवड करणे करिता सोडत प्रक्रिया दि.२१/०८/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,कार्यालय बीड येथे करण्यात येणार आहे.तरी अर्जदार शेतकऱ्यांनी सोडत प्रक्रिये करिता उपस्थित राहणे बाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बीड सुभाष साळवे यांनी कळविले आहे.

### बाजीराव पाटील विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

शिरूर कासार । प्रतिनिधी



तालुक्यातील जांब येथील स्फुर्ती शिक्षण प्रसारक मंडळाचे बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जांब ता.शिरूर का.येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ठिक ७.३०. वाजता माजी सैनिक वैजिनाथ तांबारे यांच्या हस्ते व जांब चे संरपच राधाताई अशोक खाडे यांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाचा सोहळा पार पडला ध्वजारोहनानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले यावेळी उपस्थित संरपच राधाताई अशोक खाडे उपसंरपच सातपुते अभिजीत खाडे ,जालिदर दरेकर ,भरत सातपुते,अस्लम भाई शेख,ग्रामसेवक बडे साहेब ,राजेंद्र नागरगोजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चे मुख्याध्यापक हावळे सर ,कदम सर, विद्यालयाचे सहशिक्षक मिसाळ सर, मोरे सर,जामकर सर, भांगे सर,जायभाये सर, कराड सर,पठाण सर ,मस्के सर,व शिक्षकेत्तर कर्मचारी अंगणवाडी सेविका,गावातील प्रतिष्टीत नागरीकांची उपस्थिती होती शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.


### लिंबागणेश येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवानिमित्त संगीतमय भागवत कथा सप्ताह धार्मिक उत्साहात संपन्न



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे लिंबागणेश येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी सार्वजनिक महोत्सवानिमित्त संगीतमय श्रीमद् भागवत कथा सप्ताह (दशम स्कंध) उत्साहात पार पडला. दि. ८ ऑगस्टपासून सुरू झालेल्या या धार्मिक सोहळ्याची सांगता दि. १६ ऑगस्ट रोजी काल्याच्या कीर्तनाने झाली. सप्ताहभर सकाळी पारायण, दुपारी उटी-उपहार, सायंकाळी आरती-प्रवचन आणि रात्री भागवत कथा असे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प.पू. महंत श्री ओंकार व्यास बाबा शास्त्री महानुभव (श्रीक्षेत्र पांचाळेश्वर ता.गेवराई जि.बीड )यांच्या प्रवचनाने भाविकांना अध्यात्मिक अनुभव मिळाला. समारोप प्रसंगी पोहीचा देव संस्थानचे महंत रंगनाथभाऊ वायंदेस्कर, महंत विश्वनाथ बाबा, तसेच पंचक्रोशीतील महानुभव भाविक उपस्थित होते. भजनी मंडळींमध्ये मृदंगवादक संदीप आमटे,पांडुरंग वाणी, बाजीराव दशमे, बारीक ढास ,सतिश शिंदे आदींनी सुरेल भजनांनी वातावरण भारावून टाकले. शुक्रवारी मध्यरात्री श्रीकृष्ण जन्मोत्सव अत्यंत जल्लोषात साजरा करण्यात आला. श्रीकृष्ण जन्मानंतर गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. या धार्मिक सोहळ्यासाठी मंदिराचे पुजारी विजय पाटोदेकर, राजेभाऊ आप्पा गिरे, कल्याण वाणी, सरपंच बालासाहेब जाधव, गोवर्धन गिरे, रामकिसन गिरे, अर्जुन गिरे, सुदाम रणखांब, विनायक वाणी, विक्रांत वाणी, संतोष भोसले, विठ्ठल कदम, रणजित भोसले, बसवंता खाडीलकर आदी मान्यवर व गावकरी यांनी परिश्रम घेतले. काल्याच्या कीर्तनानंतर उपस्थित सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला आणि सप्ताहाचा समारोप भक्तीमय वातावरणात झाला.

### माजी नगरसेवक दत्तात्रय थिगळे यांचे निधन



बीड । प्रतिनिधी

बीड नगर पालिकेचे माजी नगरसेवक दत्तात्रय जीवनराव थिगळे यांचे १५ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर मोंढा येथील अमरधाममध्ये १६ ऑगस्ट रोजी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शहरातील प्रतिष्ठीत नागरीक, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात मोठा परिवार असून त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे. थिगळे कुटूंबियांच्या दु:खात दैनिक मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे.

# अजित पवारांनी गुंडांची टोळी पोसली : विजयकुमार घाडगे

# शेतकऱ्यांची कर्जमाफी न केल्यास नेत्यांना गावात फिरू देणार नाही

## बीडमध्ये पत्रकार परिषद : शेतकऱ्यांचा पोरावरील हल्लयाचा बदला शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य करून घेणार

बीड । प्रतिनिधी



शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवण्याचे सोडून राज्याचे कृषी मंत्री सभागृहात रम्मी खेळत असल्याने आंदोलनाचा भाग म्हणून आम्ही सुनिल तटकरे यांना लातूर मध्ये पत्ते भेट दिले होते. त्यानंतर राष्ट्रवादीच्या गुंडानी माझ्यावर प्राणघातक हल्ला केला. अजित पवार यांनी कृषी मंत्री यांच्याबद्दल निर्णय घेतला मात्र हल्ला करणाऱ्या गुंडांचा सन्मान करून त्यांना पक्षात मोठ स्थान दिलं. शेतकऱ्यांच्या पोराने शासनाला प्रश्न विचारले तर राष्ट्रवादीचे हे गुंड त्यांच्यावर हल्ला करत आहेत. हे अजित पवार गटाला परवडणारे नाही. आम्ही याचा बदला शेतकऱ्यांच्या कापसाला १० हजार रूपये, सोयाबीनला ८ हजार रूपये हमी भाव घेऊन आणि पिक विमा शेतकऱ्यांच्या पदरात पाडून अशा भ्याड हल्याचा बदला घेणार असल्याचे अखिल भारतीय छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष ▶ उर्वरित पान २ वर

**● अशोक रोमन यांच्यावर लवकरच मोठी जबाबदारी**

अशोक रोमन यांनी बीड जिल्ह्यातील गोरगरीबांच्या प्रश्नांवर आवाज उठवून ते शासन दरबारी सोडवण्याचा प्रामाणीक प्रयत्न केला आहे. या सोबतच युवकांची मोठी फळी त्यांच्या मागे आहे. लवकरच त्यांच्यावर मोठी जबाबदारी टाकण्यात येणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी दिली.

## आंतरजिल्हा जबरी चोरी करणारे बीडमध्ये अटक

## बीड व पुणे पोलिसांची सामायिक कारवाई !

बीड । प्रतिनिधी



मौजे कुरुळी, ता.खेड जि.पुणे या भागात कमलाकर बाबाजी मोहिते हे सकाळी १० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या पिकअप गाडीने जात असताना तीन अनोळखी इसमानी त्याचा पाठलाग करून त्यांची गाडी अडवून त्यांना आरोपींच्या मारुती स्विफ्ट या गाडीत शिवीगाळ व मारहाण करून बसवले व मुळशेवाडी येथे इंडियन ऑइल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे नेऊन लूटमार करण्यात आली होती आणि यामध्ये कमलाकर मोहिते यांच्या बँक खात्यात पैसे नसल्याने आरोपींनी त्यांना त्यांच्या ओळखीच्या व्यक्तीकडून फोनपेच्या माध्यमातून २४३०० रुपये घेतले तसेच त्यांच्याकडील रोख रक्कम १५००० रुपये व महाराष्ट्र बँकेचे ए टी एम कार्ड असा एकूण ३९५०० रुपयाचा ऐवज लुटण्यात आला होता.. या गुन्ह्यातील तीन आरोपी नामे १. नितिन मधुकर शिंदे, वय २६ वर्ष, रा. चाकण, पुणे २. वैभव गीताराम माने, वय २३ वर्ष, रा. चाकण, पुणे ३. विशाल ज्ञानोबा जाधव, वय ३२ वर्ष, रा. रमाई चौक, बीड हे गुन्हा करून फरार झाले होते परंतु पोलीस ठाणे म्हाळुंगे यांना खात्रीशीर माहिती मिळाली होती की ते बीडमध्ये आलेले आहेत... सकाळी त्याचा संदेश ▶ उर्वरित पान २ वर

## नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या : खा. रजनीताई पाटील

केज । प्रतिनिधी



चार दिवसापासून बीड जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमिवर खा. रजनीताई पाटील यांनी प्रशासनाला तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी केली आहे.

शेती हा शेतकऱ्यांचा मुख्य आधार आहे. पाऊस, नैसर्गिक आपत्तीमुळे उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून त्याला तात्काळ मदतीची गरज आहे. नुकसानग्रस्त भागांचा ▶ उर्वरित पान २ वर

## तलवाडा गाव तलाव लगट आतिक्रमण वाढल्याने लगटच्या मुख्य रोडवर अपघात होता होता टळला

तलवाड़ा । प्रतिनिधी



गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गाव तलाव संरक्षण भीती लगट वाढलेल्या आतिक्रमण मुळे रहदारीच्या मुख्य रस्त्याला देखील अडथळा निर्माण होत असुन दिनांक १७/८/२०२५ रोजी भरधाव वेगात दोन्ही बाजुने आचानक वाहने आल्याने एका व्यक्तीस जिव वाचवण्यासाठी रोडच्या बाजूला ऊडी मारावी लागली सुदैवाने जिवितहानी टळली असलीतरी या रस्त्याने सातत्याने शाळकरी विध्यार्थ्यांसह ईतर वाटसरुंची मोठ्या प्रमाणात वर्दळ आसते रविवार आसल्याने शाळांना सुट्टी होती. नस्ता मोठी दुर्घटना झाली असती. या निमित्ताने मोठा अनर्थ टळल्याची या वेळी चर्चा ऐकावयास भेटली याच मुख्य रस्त्याला गाव तलावची संरक्षण भीत असुन संरक्षण भीत ते मुख्य डांबरी रस्ता आतिक्रमण धारकांनी पुर्णपने ▶ उर्वरित पान २ वर

## स.पो.नि.वर्षा व्हगाडे यांनी विद्यार्थ्यांना दिली व्यसनमुक्तीची शपथ

वडवणी । प्रतिनिधी



बीड पोलीस अधीक्षक नवनीत कावंत यांच्या संकल्पनेतून नशा मुक्त बीड जनजागृती अभियान दि. १३ ऑगस्ट २०२५ ते १७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत बीड जिल्ह्यात राबवण्यात येत आहे या अंतर्गत वडवणी पोलीस दलाच्या वतीने नशा मुक्ती विषयावर चित्रकला स्पर्धेच आयोजन करून त्याचे बक्षीस वितरण व समुपदेशनाचा कार्यक्रम दि. १६ ऑगस्ट २०२५ शनिवार रोजी वडवणी शहरातील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे / डोईफोडे मॅडम तर प्रमुख पाहुण्या तथा समुपदेशिका म्हणून वडवणी पोलीस स्टेशनच्या कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती व्ही. पी.व्हगाडे मॅडम तसेच वडवणी पोलीस स्टेशनचे पोलीस शिपाई खरात ▶ उर्वरित पान २ वर

## बीड शहरातील 15 प्रमुख रस्त्यांसाठी मिळणार 100 कोटींहून अधिक निधी

## उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचा शब्द ; डॉ.योगेश क्षीरसागरांचा सातत्याने पाठपुरावा

बीड । प्रतिनिधी



येथील नगरपरिषद हद्दीतील प्रमुख डी. पी. रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीट बांधकाम व नाली सुधारणा करण्यासाठी लवकरच १०० कोटींहून अधिक निधी मिळणार असल्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सन २०२३ मध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) २०२३-२४ अंतर्गत एकूण १७ रस्ते व नाली बांधकाम प्रकल्पांसाठी १५९ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. यापैकी २ रस्त्यांची कामे इतर योजनेतून पूर्ण झाली असून, आता उर्वरित १५ कामांसाठी नव्याने सुमारे ▶ उर्वरित पान २ वर

## सोमवारी ह.भ.प.हनुमान महाराज शेळके यांची प्रवचन सेवा

बीड । प्रतिनिधी



बीड शहरातील बार्शी रोड वरील स्वराज्य नगर येथील रहिवाशी व बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवास्थानी प्रतीवर्षा प्रमाणे यावर्षी ही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे, आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या पवित्र पर्वकाळात प्रती सोमवारी

# समाज सेवक इफ्तेखार जकीबाबा फाउंडेशन माजलगावच्या वतीने घेण्यात आलेले रक्तदान शिबीरात ३८३ रक्तदातानी केले रक्तदान

**● प्रथमच ४० मुस्लिम महिलांनी केले रक्त दान**

माजलगाव । प्रतिनिधी



स्वातंत्र्याच्या ७९ व्या स्वर्ण महोत्सवाच्या निमित्ताने दर वर्षी प्रमाणे ह्या ही वर्षी जमात ए इस्लामी हिंद व समाज सेवक इफ़्तिख़ार ज़की बाबा सोशल एण्ड वेल्फेअर फाउन्डेशन माजलगाव च्या संयुक्त विद्यमानाने घेण्यात आलेल्या भव्य रक्त दान शिबीर मध्ये तब्बल ३८३ रक्त दात्यांनी रक्त दान देऊन भारताला स्वातंत्र्य मिळवुन देनारे शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली.

जकीबाबा फाउन्डेशन हे समाजात निर्पक्ष निस्वार्थपणे काम करत आहेत, फाउंडेशन च्या माध्यमातुन आज पर्यंत १०० हुन अधिक कॅन्सर, हृदयरोग सारख्या रुग्णांचा मोफत उपचार करन्यात आला व तसेच सर्व जाती धर्माच्या लोकांच्या,शैक्षणिक,आर्थिक व सामाजिक समस्या सोडविण्यासाठी ज़की बाबा फाउंडेशन सदैव पुढाकार घेत असते ज़की बाबा फाउंडेशन व जमात ए इस्लामी च्या महिला विंग ने ह्या वर्षी रक्त दान शिबीरात सहभाग घेऊन माजलगाव चा इतिहासच घडवला तब्बल १५० हून अधिक महिलांनी रक्त देण्यास नाव नोंदवलं व ४० महिला रक्त दान करण्यात सक्षम झाले . हे रक्त दान शिबीर सफा टावर,अंबेडकर चौकात घेण्यात आला .कार्यक्रमाचे उद्घाटन मा.आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या हस्ते करण्यात आला त्यांनी आपल्या भाषणात जकी बाबानी केलेल्या सामाजिक कामावर प्रकाश टाकला तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष ▶ उर्वरित पान २ वर